महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे
दुसरा व तिसरा मजला,नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समोर, कॅम्प,पुणे - १
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID :dlrmah.mah@nic.in Web site :https://mahabhumi.gov.in

---

क्र./गावठाण/स्वामित्व /अचूक अभिलेख/का.वि.१४०१/२०२१ पुणे दिनांक: - २९/०७/२०२१

**विषय :-**"स्वामित्व" गावठाण भूमापन योजनेअंतर्गत भारतीय सर्वेक्षण विभागाकडून प्राप्त अंतिम नकाशातील क्षेत्र चौकशी नोंदवहीचे रकाना ७C यांत नमूद करणेबाबत.

**परिपत्रक:-**

"स्वामित्व" गावठाण भूमापन योजनेअंतर्गत राज्यातील ३९,७३३गावांचे गावठाण भूमापन काम करणेचे आहे.

आमचे असे निदर्शनास आले आहे की, भारतीय सर्वेक्षण विभाग यांचेकडून प्राप्त झालेल्या गावठाण भूमापन नकाशात नमूद असलेल्या क्षेत्राप्रमाणे,चौकशी नोंदवहीचे रकाना ७C (७क) यांत क्षेत्र नंमूद केले जाते.भारतीय सर्वेक्षण विभाग यांचेकडून अंतीम नकाशावर स्थलांतर दुरुस्ती (Topograpjical corrections) करतात.त्यामुळे क्षेत्रामध्ये बदल होतो.पर्यायाने क्षेत्रामध्ये तफावत येण्याची शक्यता नाकारता येत नाही.या बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे कार्यपध्दती वापरणेचे सूचना देण्यात येत आहे.

१." भारतीय सर्वेक्षण विभाग यांचेकडून नकाशावर स्थलांतर दुरुस्ती (Topographical Corrections) केल्यानंतरच गावठाण भूमापनाचा अंतीम नकाशा तयार झाल्याचे निर्णयात घोषीत करावे व सदर अंतीम नकाशानुसार मिळकतीचे क्षेत्र चौकशी नोंदवहीचे रकाना ७C (७क) यांत नमूद करणेचे आहे.चौकशी नोंदवहीच्या रकाना ७C (७क) मधील क्षेत्रांच्या नोंदी नकाशा व नगर भूमापन क्रमांकनिहाय अचूक झालेल्या आहे किंवा नाही याची खात्री वरिष्ठ पातळीवर करण्यांत यावी.

२.गावठाण भूमापन योजनेमध्ये ज्या गावांचे चौकशी व अनुसरण काम पूर्ण झाले आहे,त्या गावांमध्ये भारतीय सर्व्हेक्षण विभाग यांनी अंतीम केलेल्या नकाशानुसार मिळकतपत्रिका,सनदा व चौकशी नोंदवहीमध्ये क्षेत्र नमुद आहे किंवा नाही याची खात्री करुनच नियमानुसार गांवे परिरक्षणास घ्यावी.

स्थळ प्रतीवर मा. जमाबंदी आयुक्त, पुणे
यांची स्वाक्षरी असे.

(अ.न. बैरागी)
कार्यालय अधिक्षक,गांवठाण
जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे

प्रत:- उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद, अमरावती, पूणे, नाशिक, नागपूर, कोकण यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सातारा,पूणे,सांगली, सोलापूर,कोल्हापूर, ठाणे, पालघर, रायगड,रत्नागिरी, . सिंधुदूर्ग,नाशिक,अहमदनगर,नंदुरबार,जळगांव,धुळे, औरंगाबाद, परभणी,हिंगोली, नांदेड, बीड, उस्मानाबाद, लातूर, जालना, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ वाशिम, भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली, नागपूर,गोंदिया, वर्धा यांना माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.